# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- 422 222**

जा.क्र. यचममुवि/आस्था/2020/217

दि. 08/06/2020

## परिपत्रक

**संदर्भ -** 1) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-102020/प्र.क्र.01/सचिव (व्यय) दि. 05 जून 2020
2) सा.प्र.विभागाचा शा.नि. क्र. समय-2020/प्र.क्र.35/18 (र.व का.) दि. 05 जून 2020
3) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. यचममुवि/कुका/2020/Q117 दि. 16.05.2020 चे परिपत्रक
4) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. यचममुवि/कुका/2020/Q102 दि. 26.03.2020.

कोरोना विषाणूचा (कोव्हीड-19) प्रसार होऊ नये , तसेच कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना संसर्ग होऊ नये म्हणून महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी लॉकडाऊनचा कालावधी 30 जून 2020 पर्यंत वाढविल्याने त्याप्रमाणे सूचना संदर्भ क्र. 3 व 4 नुसार देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. 1 व 2 अन्वये महाराष्ट्र शासनाने कार्यालयात 15% किंवा कमीत कमी 15 कर्मचारी यापैकी जे जास्त असेल इतकी कर्मचाऱ्यांची उपस्थिती ठेवणेबाबतत्यानुसार विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजाकरीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

1. विद्यापीठातील विद्याशाखा / विभाग / कक्ष / केंद्र प्रमुखांनी आपापल्या विभागातील शिक्षक व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच करारावरील व कंत्राटदाराकडील दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांना (दिव्यांग कर्मचारी वगळून) आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करून घेण्यात यावे. असे करतांना एका इमारतीत 15 पेक्षा ज्यादा कर्मचारी बोलावण्यात येऊ नयेत. उर्वरित कर्मचाऱ्यांची आवश्यकता वाटल्यास त्यानुसार विभागप्रमुखांनी संबंधित कर्मचाऱ्यास बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहील. **अशा उपस्थितीबाबतचे नियोजन विभागप्रमुखांनी करून त्याची प्रत आस्थापना कक्षास सादर करावी.**

2. कार्यालय विभागप्रमुखांनी तसेच सहायक कुलसचिव व त्या वरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहील,

3. उपरोक्तनुसार संबंधित विभागप्रमुख यांनी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी आठवड्यात किमान एक दिवस कार्यालयात उपस्थित राहील याची दक्षता घ्यावी. विभागप्रमुखांनी उपस्थितीबाबत खातरजमा करून त्याच्या नोंदी ठेवाव्यात व दर आठवड्याला त्याचा अहवाल कुलसचिव कार्यालयास सादर करावा. विभागप्रमुखांनी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील. अन्यथा शासन निर्णयात नमुद तरतुदीनुसार कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

4. विद्यापीठातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

5. प्रतिबंधित क्षेत्रात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता बोलावू नये, त्यांना घरी राहून (Work from Home) राहून काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. अश्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयात न येता विभागप्रमुखांना ई-मेलद्वारे सूचित करावे.

6. लॉकडाऊन कालावधीत कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रित करण्यात येत असल्याने भविष्यात अशी परिस्थिती लक्षात घेता, आवश्यकता व तातडीच्या कामाचा निपटारा करण्यासाठी ई-मेल, नेहमीच्या वापराचा ई-मेल तसेच व्हॉट्सअॅप व लघुसंदेश (SMS) चा वापर प्रशासकीय कामासाठी तसेच सूचना देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

7. उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी शासनाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

**कुलसचिव**

**प्रत —** 1) मा. कुलगुरू कार्यालय, कुलसचिव, वित्त विभाग यांचे कार्यालय
2) विद्याशाखा संचालक, प्रमुख सर्व विभाग/केंद्र/ कक्ष/ सर्व विभागीय केंद्रे
3) विद्यापीठ संकेतस्थळ